# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 04/01/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

### नागपूर ग्रामीण पोलीसांचा रेझिंग डे सप्ताह उत्साहात साजरा

०२ जानेवारी हा दिवस संपुर्ण महाराष्ट्रात पोलीस स्थापना दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्या निमीत्ताने नागपूर ग्रामीण हद्दीतील अनेक शाळा, कॉलेजांमध्ये नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे 'रेझिंग डे' सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत असुन या दरम्यान नागपूर ग्रामीण येथील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस रेझिंग डे दिनानिमित्य विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने पो. स्टे. सावनेर येथे श्रीमती मंगला मोकासे सहायक पोलीस निरीक्षक यांनी महिला दक्षता समिती व महिला पोलीस पाटील यांना पोलीस रेझिंग दिनानिमित्य महिला सुरक्षा विषयक गुड टच बॅट टच, डायल ११२ शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध महिला विषयी योजनेची माहिती दिली. पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत भिवापूर विद्यालय भिवापूर येथील विद्यार्थिनींना सायबर क्राईम व वाहतूकीचे नियमांबद्दल माहिती देऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पोलीस स्टेशन भिवापूर तर्फे कब्बडी खेळाचे सामने ठेवण्यात आले व मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे पोलीस स्टेशन हद्दीतील महिला व अंगणवाडी सेविका यांना महिला सुरक्षा बाबत तसेच त्यांच्या हक्काबाबत, पोस्को कायदा, सायबर सिक्युरिटी व महिला अत्याचार बाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. कळमेश्वर पोलीसांनी प्रताप हायस्कूल कळमेश्वर येथील विद्यार्थी विद्यार्थीनिंना पोलीस प्रशासन कसे काम करतो याबाबत माहिती देवून पोलीस स्टेशन मध्ये प्रत्यक्ष पोलीस निरीक्षक ते पोलीस शिपाई कसे काम करतात ते प्रत्यक्ष स्टेशन डायरी, क्राइम रायटर, बीट अंमलदार, वाहतूक अंमलदार कसे काम करतात याबाबत माहिती देऊन पोलीस स्टेशनला असलेली शस्त्राविषयी, अपघात किंवा इतर तात्काळ मदतीसाठी डायल ११२ वर कॉल करून कशी मदत मिळते त्या बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. पो.स्टे केळवद अंतर्गत अरविंद इंडो पब्लिक स्कूल हेटी सुर्ला येथील NCC विद्यार्थी विद्यार्थीनिंना वाहतूक नियमाबाबत माहिती देण्यात आली. तसेच केळवद येथील चांडक विद्यालय येथील विद्यार्थिनींना सायबर क्राईम व व गुड टच–बॅड टच बद्दल माहिती देऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन MIDC बोरी अंतर्गत निस्ताने विद्यालय टाकळघाट येथील विद्यार्थी विद्यार्थिनींना सायबर क्राईम व वाहतूक नियम बद्दल माहिती देऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले असे विविध उपक्रम सप्ताहा दरम्यान राबविण्यात आले.


स्वागत कक्ष




RAISING DAY


महाराष्ट्र पोलीस
RAISING DAY

## <u>रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद</u>

<u>पो.स्टे. केळवद</u> :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर हत्तीसरा शिवार येथे दिनांक ०३/०१/२०२४ चे ०२.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ पोस्टे परिसरात पेट्रोलिंग कामी फिरत असताना मुखबीरव्दारे माहीती मिळाली की, पादरी खापा (एम पी) येथुन कवठा मार्ग हत्तीसर्राकडे एक लाल रंगाचे ट्रॅक्टर मध्ये अवैध्यरित्या विना परवाना गौनखनिज रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशी खात्रीशिर खबर मिळाल्याने मौजा हत्तीसर्रा शिवारातील कवठा कडून येणाऱ्या कच्चा पांयदळ रस्त्यावर पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ पोहचुन नाकाबंदी करीत असता महिंद्रा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी इ—३७६४ व ट्रॉली लाल रंगाची अवैधरित्या विना परवाना गौनखनिज रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने महिंद्रा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी इ—३७६४ व ट्रॉली लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉलीचा **चालक आरोपी नामे — अशोक शामराव सरयाम, वय ३१ वर्ष, रा. केळवद वार्ड क्र. १, झोपडपट्टी ता. सावनेर** याचे ताब्यातून १) महिंद्रा ट्रॅक्टर मुंडा क्र. एम. एच—४०/बीई—३७६४ आणि तिची ट्रॉली विना नंबर किंमत ६,००,०००/— रु. २) ०१ ब्रास रेती गौणखनिज किंमती ५०००/— रु. असा एकुण ६,०५,०००/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— सरतर्फे पोहवा मंगेश धारपूरे पोस्टे केळवद यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. सह कलम ४८(८) जमिन महसुल अधिनियम १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक फौजदार केसरे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नागरे मो. क्र. ९०११५९६५०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**